# मोजमापे-३

बैलगाडीसाठी गणूला कासरा पाहिजे.
गणू बाबांबरोबर भिकाजीकडे गेला.
भिकाजीने कासरा दिला. गणू आणि
बाबा घरी आले.
कासरा किती लांब आहे ?
बाबांनी कासरा मोजला.
कासरा सात हात लांब आहे.



भिकाजी कासरे
बनवतो.



© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई-४०० ००५.
प्रकाशक: इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
(विद्याभारती) पुणे-४११ ०२९.



गणूने कासरा मोजला.
गणू म्हणाला, "कासरा दहा
वाव लांब आहे."


बाबांनी एक गंमत केली. त्यांनी
सखूला बोलावले. सखूने कासरा मोजला.
सखू म्हणाली, "कासरा बारा वाव लांब
आहे."


गणूला समजेना, कोणाचे बरोबर!

गणूला आठवले,
बाबू सुताराकडे टेप आहे. गणू बाबू सुताराकडे
गेला. बाबूने गणूला एक युक्ती सांगितली.




गणूने काय केले? सामानातील पट्टी आणि दोरा घेतला.






दोरा
असा धरला
आणि पट्टीवर गुंडाळला.





गणूने पट्टीवर दोऱ्याचा
एक वेढा दिला.



आणखी अर्धा
वेढा दिला.
गणूने दोऱ्याला
इथे गाठ मारली.

अंदाजे एक मीटर लांबीचा दोरा.





गणूने १ मीटर लांबीचा दोरा
हातात धरला.
बाबांनी कासरा मोजला.

बाबांनी दोरा हातात धरला.
गणूने कासरा मोजला.
गणू म्हणाला, "कासरा सात मीटर लांब आहे."
बाबा म्हणाले, "कासरा सात मीटर लांब आहे."
बाबांनी गणूला शाबासकी दिली.

तुम्हीसुध्दा असा दोरा तयार करा.

कासरा सात मीटर लांब आहे. कासरा गणूच्या
बाबांच्या सात वाव एवढा लांब आहे.
गणूच्या बाबांचा वाव केवढा आहे?

